# भारतातील सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विषमताः एक अवलोकन

**शिवाजी दामाजी लहाने**
एम.ए., (म.फुले-डॉ. आंबेडकर विचारधारा)

**प्रस्तावना :-**

भारतीय राज्यघटनेच्या माध्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातील प्रत्येक नागरीकाला स्त्री, पुरुष यांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय हक्क प्राप्त करुन दिले आहेत. त्याच बरोबर विचार स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र, श्रध्दा, पुजा यांचे स्वातंत्र्य त्यांच्या मधील समानता (दर्जा) सर्व संधीची समानता या सर्व बाबी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या रुपाने दिले आहे. आज जवळ जवळ भारतात स्वातंत्र्य मिळुन ६० वर्ष लोटली आहे. भारतातील राज्यकर्त्या मंडळींनी संविधाना प्रमाणे कुठल्याच क्षेत्रात प्रगती केल्याचे दिसत नाही. संविधान म्हणते भारतातील सर्वसामान्यांना समान अधिकार असला पाहिजे पण सामाजिक राजकीय हक्क असून चालत नाही. त्यासाठी आर्थिक समाजनताही अत्यंत महत्वाची बाब आहे. आर्थिक समानता ही सर्वबाबींची चावी आहे. आज आपण जगतिकीकरणाचा स्वीकार करत असतांना, जगातील देशाच्या प्रगतीचा विचार करीत असतो. व त्याच्या प्रगतीच्या आलेखाचे आकडे मोजत असतो. भारताने स्वातंत्र्यानंतर अशी कुठलीही मोठी गोष्ट केलेली आहे का? नाही. आज दररोज २६ कोटी लोक अर्धपोटी उपाशी झोपतांना दिसतात. हा आकडा शासनाचा अहवाल आहे. (BPL) धारक ही संख्या दिवसें दिवस वाढत चालली आहे. बेकारीची संख्या वाढती आहे.

भारतातील राज्यकर्ते मंडळी यांनी आपली मक्तेदारी निर्माण केली आहे. ज्यांच्या घरावर सोन्याची पत्रे आहे ते आकाशाला गवसणी घालण्याचा विचार करीत आहे. त्या उलट झोपडी नष्ट होऊन गरीब माणूस आज गरीब बनत चालला आहे. तो रस्त्यावर येऊन रस्त्याच्या गडेला फुटपाथवर झोपण्याची वेळ आली आहे. श्रीमंत हे आधिकच श्रीमंत होत आहे, गरीब अधीकच गरीब होत आहे. याला कारणीभुत फक्त येथील राजकीय मंडळी आहे. भारतीय राज्यघटना समानता देते तर मग शिक्षणाचे तीन तेरा का वाजले? आजच्या परिस्थितीमध्ये शिक्षणाचा विचार केला तर अत्यंत वाईट अवस्था शिक्षणाची झाली आहे. एकीकडे शिक्षणाचे कायदे पास करायचे, त्याचा उहापोह करायचा व दुसरीकडे शिक्षण महाग करायचे. आजच्या परिस्थितीमध्ये सर्व सामान्याच्या मुला मुलींना शिक्षण घेणे अत्यंत वाईट बनत चालले आहे. खाजगी शाळा, त्यांच्या मनमानी फीस घेतात. तेथे श्रीमंतांच्या अधिकाऱ्याची, भ्रष्टाचारी मंडळीची मुले त्यांना सर्व सेवा सुविधा दिल्या जातात. तसेच गुरुकुल शिक्षण पध्दती एक-एक दोन-दोन लाख रुपये वर्षाला फीस असते. तेथे बिगारी काम करणाऱ्याची शेतकऱ्यांची, कष्टकऱ्यांची, कामगारांची मुले शिकु शकतील काय?

आज या परिस्थितीमध्ये शिक्षण ही अत्यंत वाईट बाब बनत चालली आहे. तांत्रिक शिक्षण, व्यावसायिक शिक्षण त्यात भर पडत आहे, ती 'अभिमत विद्यापीठाची', परदेशी विद्यापीठाची. यांच्यामुळे गरीब व मध्यमवर्गीय यांना शिक्षण घेणे अवघड झाले आहे. आज स्पर्धेच्या युगात टिकायचे झाले तर, तांत्रिक शिक्षण, व्यवसायिक शिक्षण आवश्यक आहे. परंतु,

गरीबाकडे लाख लाख रुपये ट्युशनची फी भरण्यासाठी नाही. त्यामुळे या देशात गरीब व श्रीमंताची दरी वाढत चालली आहे. खाजगीकरण व बाजारी करणामुळे भारता सारख्या देशावर वाईट परिणाम होत असतांना दिसत आहे.

भारतीय राज्य घटनेत आरक्षणाचा हक्क आहे. खाजगी करणामध्ये नाही. तेथे भेदभाव चालत आहे. काही जातींनाच आज कारखान्यामध्ये कंपन्यांमध्ये वाव आहे. त्याच प्रमाणे भारतामध्ये आज अंधश्रध्देच्या नावाखाली काळे धंदे चालु आहे. साधुची फसवेगिरी, स्त्रीयांचे शोषण, धार्मिक कर्मकांड, धर्माच्या नावाखाली आज सुध्दा बळीची प्रथा दिसत आहे. याला कारणीभुतही अंध्दश्रध्देची खुळचट कल्पना, धार्मिक आधार, विज्ञानाचा आभाव हे का घडत आहे? याला कारणीभुत येथील जाती व्यवस्था आहे. कारण काही जाती आजही दुसऱ्या जातींचे शोषण करत आहे. राजकीय मंडळी यांना भारता सारख्या देशात पैसा ठेवायला जागा नाही. त्यांचे पैसे इतर देशांच्या बँकेत आहे. जग चंद्रावर जाऊन, मंगळावर लोकवस्ती बनविण्याचा विचार असतांना भारत दुधात चंद्र पाहत आहे. असे अनेक प्रश्न तोंड वासुन उभे असुन त्याची सोडवणुक ती समस्या कशी नष्ट होईल याकडे येथील राजकीय मंडळी अजिबात लक्ष देत नाही. त्यांचे फक्त पैसे कमवणे, मग तो कुठल्याही मार्गाने आला तरी चालेल. ज्या लोकशाहीच्या पवित्र मंदीरामध्ये जनता विश्वास टाकुन त्यांना संसदेमध्ये पाठविते. ते जनतेचे प्रश्न मांडण्यास यशस्वी दिसत नाही.

भारतासारखी केवलीवानी अर्थव्यवस्था असणाऱ्या देशांनी जागतिकीकरणाचा स्विकार करत असतांना, जपान, चिन, इस्त्राईल या देशाचा बोध घ्यावयास पाहिजे. १९४२ च्या युध्दात जपान जळुन राख झाला होता. पण त्यांनी फिनीक्स पक्षा प्रमाणे भरारी घेऊन जागाला तांत्रिक बाबींचा पुरवठा करतांना दिसत आहे. ती सुध्दा दर्जेदार पणाची चिन ने आज संपुर्ण जगाचे मार्केट ताब्यात घेतले आहे. मग आपला देश का नाही. हे करु शकत नाही का? दररोज सुशिक्षीत बेकारांची फौज बाहेर पडत आहे. आर्थिक विषमता, चुकीचा निर्णय, भ्रष्टाचार, महागाईचा डोंगर अशा अनेक बाबींचा विचार केला, तर देश महासत्ता होईल असे आपणांस वाटते का? याचा विचार सर्वसामान्य जनतेने केला पाहिजे. 'भारत हा कृषी प्रधान देश आहे व देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा हा कृषी' आहे असे आपण फक्त वाचतो. मग देशाला जेवण देणारा, अन्न धान्याचा पुरवठा करणारा शेतकरी आत्महत्या का करत आहे? जगाचा स्विकार करत असतांना जगात शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सेवासुविधा, बी-बीयाणे, खत औषधे यावर दिली जाणारी सबशिडी इतर देशाच्या प्रमाणात भारतात का दिली जात नाही? याला सरकारचे ढिसाळ धोरण कारणीभुत आहे. भांडवलदार, मंत्री, उद्योगपती यांनी आत्महत्या केलेली दिसत नाही. दुसरी बाब म्हणजे आपल्या देशाला बेकारी व अधोगतीला जाण्यासाठी देशाची आर्थिक परिस्थिती, ढासळण्यासाठी कारणीभुत कुठली व्यवस्था असेल तर नोकरशाही.

भ्रष्टाचार कसा करायचा व तो कसा पचवायचा याची सर्व पळवाट नौकरीशाहीने शोधुन काढली आहे. शिपाया पासुन ते सचिवापर्यंत भ्रष्टाचाराने भरबटल्या गेले आहे. त्याला एक गोडस नाव टक्केवारी हे देण्यात आले आहे. या टक्केवारीने व कमिशनने देशाचे वाटोळे केले आहे. देशात दररोज भ्रष्टाचाराची श्रृंखला, साखळी उघड पडत आहे. भ्रष्टाचार केला की त्याला अधीच

व्यवस्था सोडवण्यासाठी तयार असते. मग ह्या भ्रष्टाचारी लोकांच्या संपत्तीत भरमसाठ वाढ होत असतांना ह्या लोकांची संपत्ती जप्त का होत नाही? याला राजकीय मंडळी जबाबादार आहे.

राजकीय मंडळी व नोकरशाही हा ह्या भ्रष्टाचार करण्यासाठी ऐकमेकांच्या हातात हात घालुन चालत आहे. भारता सारख्या देशात भुकबळी, बेकारी अशा अनेक समस्या असतांना त्यांच्या कडे कोणीही लक्ष देत नाही. लक्ष देण्याऐवजी येथे ढोंगी माणसाच्या अंदोलनाचा मुद्दा लावुन धरला जातो. देशात दररोज अनेक बालक कुपोषणामुळे मृत्युमुखी पडतात. याची दखल घेण्याचे सोडुन एखाद्या नटीने कुठले कपडे घातले याची प्रसिध्दी दिल्या जाती. काही लोकांना राजसत्तेच्या जोरावर शिक्षण, संपत्ती अनेक गोष्टीला गुलाम बनविले आहे. ज्या समाजाने विश्वास टाकुन सत्ता चालविण्याचा अधिकार ज्यांना दिला त्यांनी आपले कर्तव्य म्हणुन काय केले? आपली शक्ती, आपले राष्ट्र आपले घर समजुन काम केले तर भारतासारख्या बलाढ्य लोकशाहीचा विकास होण्यास वेळ लागणार नाही. एवढेच नाही तर सर्वच आघाडीवर, सर्वच क्षेत्रात भारत देश हा पुढे गेलेला दिसेल. कारण भारता सारख्या सुख संपन्न प्राकृतीक सौदर्याने नटलेल्या देशासारखा देश जागत कोठेच नाही. असे जर्मन तत्ववेत्ता मॅक्स मुलर याने १०० वर्षापुर्वी आपले विचार मांडले होते.

**समारोप**

देशातील शेतकरी, कामगार, शेतमजुर, कष्टकरी यांच्यासह येथील बेरोजगार युवक यांच्या विकासासाठी राज्यघटना जरी कटीबध्द असली तरी येथील राज्यकर्ते मात्र येथील बडे भांडवलदार, उद्योगपती, जमिनदार यांच्याशी कटीबध्द असल्याने आपल्या देशात मोठ्या प्रमाणात शेतकरी आत्महत्या होतांना आपण पाहत आहोत. त्याचाच परिणाम कित्येक गोरगरिब कुटुंब रस्त्यावर आली आहेत. आणि येथील श्रींमंत वर्ग देशाची सत्ता गाजवतांना दिसत आहे. मात्र देशात शिक्षणातील विषमता निर्माण करुन राज्यकर्त्यांने गोरगरिबांना शिक्षणाच्या व विकासाच्या मुख्य प्रवाहापासुन दुर लोटण्याचे काम चालवुन मोठ्या प्रमाणात गरिबीला प्रोत्साहन दिलेले आहे.

**संदर्भ**

१. लोकराज्य २००९
२. लोकराज्य २०१६
३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक चिंतन (लेख)
४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची कामगार चळवळ-संपादक प्रदिप गायकवाड
५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक चिंतन-डॉ. नरेंद्र जाधव